# महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९

ज्या नियमांचा भंग झाला म्हणजे कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करावी लागते ते हे नियम

म. ना. से. (शिस्त व अपील) नियम १९७९ प्रमाणे कार्यवाही करुन शास्ती का लावतात हे या निमयावरुन कळते.

- वर्तणुक नियमातील महत्वाच्या तरतूदी
- शासन म्हणजे महाराष्ट्र शासन
- शासकीय कर्मचारी म्हणजे
- शासकीय सेवेत अथवा पदावरील नियुक्त कर्मचारी जरी त्याच्या सेवा महामंडळ / स्थानिक संस्था / अन्य शासन यांचेकडे सोपविल्या असल्या तरी

# कर्मचाऱ्याचे कुटुंबीय म्हणजे

अ. स्वत:, तसेच पती अथवा पत्नी सोबत राहत असो अथवा नसो

ब. कर्मचाऱ्यावर अवलंबून असणारा मुलगा / अविवाहीत मुलगी / सावत्र किंवा दत्तक आपत्य

# कर्मचाऱ्याचे कुटुंबीय म्हणजे

क. कर्मचाऱ्याच्या अथवा पती किंवा पत्नी या नात्याने निर्माण झालेले व कर्मचाऱ्यावर अवलंबून असलेली तसेच अन्य व्यक्ती.

ड. कुटुंबाची व्याख्यामध्ये नमूद व्यक्तींनी कर्मचाऱ्याची समाजातील प्रतिष्ठा लक्षात घेऊन गैरफायदा घेणयाच्या दृष्टीने काही गैरकृत्य केले तर त्याची जबाबदारी कर्मचाऱ्यावर येईल व त्यासाठी विभागीय चौकशी करता येऊ शकते.

## सचोटी व कर्तव्य परायणता (नियम ३)

नितांत सचोटी म्हणजे भारताच्या सार्वभौमत्वावर विश्वास/ भारताच्या राज्यघटनेप्रमाणे वागणूक/निर्णयात पारदर्शकता/निर्णय घेताना स्वार्थी हेतू नसावा/कायदा सुव्यवस्था/ परराष्ट्र धोरणाबाबत वाच्यता न करणे/भारतातील कमकुवत वर्गाबद्दल सहानुभूती. (शा. अ. सु. दि. २३/१०/२०१५)

# कर्तव्य परायणता

- कर्मचाऱ्याला शासकीय कर्मचारी म्हणून राहण्यास अशोभनीय ठरेल अशी कृती न करणे
- सद्सद् विवेक बुद्धीला न पटणाऱ्या गोष्टी करु नयेत. सद्सद्विवेक बुद्धी / नियम / कायदा यांचेशी विसंगत गोष्टी वरिष्ठांनी करण्यास सांगीतले तर त्याचे लेखी पृष्ठांकन / संमती प्राप्त करणे आवश्यक आहे व त्यानंतरच तसे आदेशावर कार्यवाही करावी (शा. नी. दि.२४/२/२०१४ पहावा)

# कर्तव्य परायणीं

- पर्यवेक्षक पदावरील कर्मचाऱ्याने त्याच्या हाताखाली काम करणारे कर्मचारी वरील प्रमाणे वागतात का नाही हे पहाणे त्यांचे कर्तव्य आहे.

- ९० टक्के  विभागीय चौकशी प्रमाणे वरील नियम तीनवर आधारीत असतात

- शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे
- कंपन्या / भागीदारी संस्थांमध्ये स्वत:च्या कुटुंबियांना नोकरी लावताना शासनाची परवानगी आवश्यक (४)
- राजकारण व निवडणूकांमध्ये भाग घेण्यास मनाई (५)
- अर्थ सहाय्य्य किंवा कार्य करता येणार नाही. परंतु मतदान करता येईल.

- शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे
- घरावर / वाहनावर निवडणूक चिन्ह लावू नये.
- अवलंबून व्यक्तीसही सदर प्रतिबंध लागू
- अवलंबून व्यक्ती कर्मचाऱ्याच्या नियंत्रणाबाहेर असल्यास शासनास कळविणे बंधनकारक
- निदर्शने व संप याकरिता प्रतिबंध. परंतु शासन मान्य संघटनेच्या आदेशानुसार शांततापूर्वक निदर्शने अभिवेदन किंवा संप करता येईल (६)

- शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे

- संघटनेमध्ये भाग घेणे – कोणत्याही राजकीय किंवा इतर संघटणेमध्ये भाग घेता येणार नाही (८)

- वृत्तपत्रे / दूरचित्रवाणीवर सरकारी कामकाज धोरणांबाबत प्रतिक्रीया देता येणार नाही परंतु साहित्त्यीक / कलात्मक बाबीवर लिखाण करता येईल फेसबूक / व्हॉटस् अप वर प्रतीक्रिया देता येणार नाही किंवा प्रतिसाद देता येणार नाही (९)

- समिती किंवा अन्य प्राधिकरणासमोर साक्ष देणे (१०)

- **शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे**

- कर्मचारी स्वत: कोणताही निधी उभारु शकणार नाही किंवा कोणा करता गोळा करता येणार नाही (११)

- देणगी गोळा करणे (१२)

- विवाहा प्रसंगीही कर्मचारी अथवा कुटुंबीय देणग्या स्विकारु शकणार नाही (आहेर) पण नातेवाईकांकडून मर्यादीत स्वरुपाचे आहेर घेऊ शकतील.

- शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे

- शासकीय कर्मचाऱ्याचे कामकाजाचे संदर्भात नसणाऱ्या नातेवाईकाकडून वर्ग – १ चे अधिकारी रु.२५000/– वर्ग २ चे अधिकारी रु.१५000/– वर्ग ३ चे कर्मचारी रु.७५00/– वर्ग ४ चे कर्मचारी रु.१000/–(शा. अ. सु. दि. २३/१0/२0१५)

- विनामुल्य वाहतुक / भोजन / निवास व्यवस्था / आर्थिक लाभ स्विकारता येणार नाहीत (१२)

- शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे

- विवाह / धार्मिक कार्यक्रमात प्रासंगिक भोजन घेतल्यास चालू शकते.

- स्वत:च्या सन्मानार्थ समारंभ गौरव सभा आयोजित करता येणार नाही.

- दुसऱ्या कर्मचाऱ्यांच्या कार्यक्रमात सहभागी होता येणार नाही. अपवाद निवृत्तीचा साधा समारंभ (१३)

- शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे

- तसबीर काढुन घेण्याकरिता बसणे (१४)

- राजीनामा देण्यास  सांगणे – दुसऱ्या कर्मचाऱ्यास अशा प्रकारचा सल्ला देणे (१५)

- खाजगी नोकरी अथवा उद्योग करता येणार नाही (चोविसतास सरकारी कर्मचारी) (१६)

- शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे

- कर्मचाऱ्याने नोकरी स्विकारल्या नंतर तन आणि मन सरकारला अर्पण करणे गरजेचे आहे म्हणून (नियम )

- उधार उसनवार देण्याघेण्यावर निर्बंध. जवळचे नातेवाईक मित्र यांचेकडून छोट्या रकमा अपवादात्मक बाब म्हणून स्विकारता येतील. (नियम )

- **शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे**

- शेअर्स मध्ये रोज खरेदी विक्री करता येणार नाही. तसेच नित्याचा कर्जबाजारीपणा ही गैरवर्तणूक. नोकरी गमवण्यास कारणीभूत. (१७)

- स्थावर / जंगम मौल्यवान मालमत्ता नियुक्तीनंतर त्वरीत व सेवेत असताना ठरावीक कालावधीनंतर जाहीर करणे (१९)

- शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे

- कृती व चारित्र्याचे प्रतिसमर्थन (२२)
- महिला कर्मचाऱ्याचे छळास प्रतिबंध (२२ अ) शासकीय कर्मचारी कामाच्या ठिकाणी महिला कर्मचारी / इतर महिला व्यक्ती यांचेशी लैंगीक गैरवर्तन करणार नाही. लैंगीक छळ होईल असे शब्द चित्र याचा वापर करणार नाही.
- शा अ सु २३/१०/२०१५ प्रमाणे पदोन्नतीचे अमिष दाखविणे/ पदोन्नती बदली नाकारणे/ धमकी देणे तेही लैगिक अत्याचारासह मोडते.

- शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे

- कामाचे ठिकाणामध्ये कार्यालयाची इमारत, भेटीचे ठिकाण, प्रवास करण्याचे वाहन यांचा समावेश होतो.

- सार्वजनिक संस्थेच्या नावाशी सहकार्य.

- शासकीय कर्मचारी एखाद्या संस्थेस त्याचे नाव देऊ शकणार नाही

- शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे

- जातीय संस्थांचे सदस्यत्वाबाबत बंधन

- जी संस्था जातीय / धार्मिक विद्वेश / तणाव वाढवीत असेल त्या संस्थांचे सभासद होता येणार नाही. त्या संस्थेला आर्थिक मदत करता येणार नाही. कुटुंबियांवरही हे बंधन. (२४)

- शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे

- आमदार / मंत्रीमहोदय राजकारणी व्यक्ती मार्फत शासकीय कामाबद्दल (बदली / नियुक्ती) दबाव आणता येणार नाही. (२३)

- परंतु मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना सामाजिक न्याय व आदिवासी मंत्र्यांकडे अर्ज करता येईल.

## शासकीय कर्मचाऱ्यास खालील बाबीस प्रतिबंध आहे

विवाह – ज्याचा वैवाहिक जोडीदार हयात आहे अशा व्यक्तीशी कर्मचाऱ्यास विवाह करता येणार नाही. द्विभार्या प्रतिबंधक कायदा लागू (८२६)

विवाहात हुंडा घेता / देता येणार नाही. कुटुंबीयांच्या बाबतीत सुद्धा (२७)

मादक पेये अथवा मादक द्रव्य कायद्याचे पालन करणे गरजेचे आहे. मद्यार्क अंश सापडल्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करता येईल

# धन्यवाद